**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करण्यासाठी सर्वांनी पाठिंबा देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन.**
2. **राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून ५७ ऐवजी १०२ संवर्गातल्या पदांची भर्ती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.**
3. **ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.**
4. **अकोल्यात आज ४३ पूर्णांक ८ दशांश अंश इतक्या कमाल तापमानाची नोंद/ अनेक जिल्ह्यांसाठी उष्णतेचा येलो अलर्ट जारी.**

---------------------------------------------

नारी शक्ती वंदन

नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करून २१ व्या शतकातला सर्वात मोठा निर्णय भारत घेणार आहे. त्यासाठी सर्वांनी पाठिंबा द्यावा असं आवाहन पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत आयोजित नारी शक्ती वंदन संमेलनात ते बोलत होते. महिलांच्या सहभागान देशातली लोकशाही बळकट होत असल्यानं या आरक्षणाची गरज आहे. राष्ट्रपतींपासून पंतप्रधान पद भूषवताना या देशात महिलांनी स्वतःची अमीट छाप उमटवली असल्याचंही ते म्हणाले. दिनांक १६ ते १८ एप्रिलच्या दरम्यान संसदेत नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांवर चर्चा होणार आहे, असं ते म्हणाले. गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा चर्चिला जात होता आणि सर्वच राजकीय पक्षांनी या दिशेनं प्रयत्न केल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. २०२३ मध्ये या अधिनियमाला मंजुरी दिली तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी याला पाठिंबा दिला होता याची आठवण त्यांनी यावेळी केली........

***(होल्ड बाइट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

२०२९ च्या निवडणुकांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी विरोधी पक्षांसह सर्वांनी केली. त्या दिशेनं सरकारनं प्रयत्न सुरू केले होते आणि विविध घटना तज्ज्ञांशीही चर्चा सुरू होती, असं पंतप्रधान म्हणाले.

-----------------------------------------------

सोनिया गांधी

लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणापेक्षाही मतदारसंघांची फेररचना हा अधिक गंभीर मुद्दा असल्याचं काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे. फेररचना विषयक प्रस्ताव अत्यंत धोकादायक आणि संविधानातल्या तरतुदींचं हनन करणारा असल्याची टीका त्यांनी वृत्तपत्रात लेख लिहून केली आहे. लोकसभा आणि विधानसभांमधे महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठीचं विधेयक 'नारी शक्ती वंदन अधिनियम', २०२३ मधेच मंजूर झालं. २०२४ च्या निवडणुकांपासूनच या सुधारणा लागू करण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली होती. पण सरकारनं ती फेटाळून लावली याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली. आगामी जनगणना आणि जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना झाल्यावरच नवीन सुधारणा लागू झाल्या पाहिजेत, अशी विरोधकांची मागणी असल्याचं गांधी यांनी नमूद केलं. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधे विधानसभा निवडणुका ऐन भरात असताना महिला आरक्षण विधेयकावरुन विरोधकांवर दबाव आणण्याचा हा प्रयत्न असल्याच त्यांनी या लेखात लिहिलं आहे.

-----------------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय/MPSC

शासनाच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीन सुलभ व्हावी, याकरिता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा, राजपत्रित गट-अ आणि गट-ब परीक्षा योजनेअंतर्गत सहा सेवांमधील एकूण ५७ संवर्गांमध्ये पदभरती केली जाते. सुधारणेनंतर या सेवांमध्ये ४५ संवर्गांचा नव्यानं समावेश करून याअंतर्गत एकूण १०२ संवर्गांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्यानं १८ सेवांचा आणि ९३ संवर्गांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबवला जाणार आहे. आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या आणखी सहा जिल्ह्यांचा समावेश करायला मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. सध्याच्या २७

आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये ही योजना राबवली जाणार आहे. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आशा भोसले यांच्या संकल्पनेतील संगीत संस्था स्थापन करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

-----------------------------------------------

दुर्घटना

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या नागपुरातील कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्पात आज सकाळी दुर्घटना घडून ८ अधिकारी आणि कर्मचारी भाजल्यानं जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. ६६० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक १० मध्ये राख काढण्याचं काम सुरू असताना गरम वाफ आणि राख बाहेर पडल्यानं ही घटना घडली. जखमींना तातडीनं नागपूरमधील Max Hospital इथं उपचारासाठी दाखल करण्यात आल आहे. काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

-----------------------------------------------

भोंदूबाबा अशोक खरात

सक्तवसुली संचालनालयानं 'मनी लॉन्डरिंग' प्रतिबंधक कायद्यांतर्गत भोंदूबाबा अशोक खरात आणि इतरांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. नाशिकमधल्या ५, पुण्यातल्या ३, आणि शिर्डीतल्या ३ ठिकाणी आज सकाळपासून छापेमारी सुरू आहे. ही कारवाई नाशिक जिल्ह्यातल्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या खंडणी, धार्मिक फसवणूक, औषधांचा वापर करून केलेले अत्याचार तसंच महिलांसह पीडितांवरच्या गुन्ह्यांच्या प्रकरणाशी संबंधित आहे.

-----------------------------------------------

सेवा उपक्रम

उद्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यात आहेत. महावितरणच्या महाल विभागान तुळशीबाग येथील मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणि भोजन वाटपाचा उपक्रम राबविला. तर गोंदिया शहरात आज तरुण-तरुणींनी बाईक रॅली काढत समतेचा संदेश दिला. निळ्या ध्वजांनी सजलेल्या या रॅलीमुळे संपूर्ण शहर निळ्या रंगात न्हाऊन निघाल्याचं चित्र दिसून आलं.

-----------------------------------------------

मार्गदर्शन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त उद्या १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ इथं भारत सरकारच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनचे माजी उपाध्यक्ष अशोक मेंढे यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आलं आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नैतिकता' या विषयावर ते मार्गदर्शन करतील.

-----------------------------------------------

बर्डी ते चिचोली

नागपूर महानगर पालिकेच्या परिवहन विभागाद्वारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त उद्या बर्डी ते चिचोली दरम्यान विशेष बस चालविण्यात येणार आहे. नागरिक आणि पर्यटकांच्या सुलभ आणि सोयीस्कर प्रवासासाठी बर्डी, वाडी, खडगाव, चिचोली आणि फेटरी या मार्गावर विशेष बस चालविण्यात येणार आहे. बर्डी येथून सकाळी ७ ते संध्याकाळी ७ या वेळेत दर तासाला या बसेस सुटतील. बौद्ध स्मारके, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मौल्यवान वस्तूंचे दर्शन घडवणारे संग्रहालय आणि इतर महत्त्वाच्या वास्तूंना भेट देणाऱ्या अनुयायांच्या सुविधेसाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

-----------------------------------------------

आशा भोसले अंत्यसंस्कार

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं काल वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर आज दादर इथल्या शिवाजी पार्क स्मशान भूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे, अभिनेता अमीर खान आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

-----------------------------------------------

आंदोलन

अकोला शहरात कचरा घंटागाडी सेवेसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या शुल्काविरोधात पुन्हा एकदा विरोधकांनी आंदोलन केलं आहे. अकोला महापालिकेची आज सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महापौर कक्षे समोरच आंदोलन सुरू केलं. प्रत्येक घराकडून वार्षिक ६०० रुपये शुल्क आकारण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. हा निर्णय नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारा

असून निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांचे मत, आक्षेप आणि सूचना विचारात घेण्याची त्यांनी मागणी केली आहे.

-----------------------------------------------

संयुक्त कारवाई

यवतमाळ जिल्हयात अवैध कापूस बियाणे विक्री विरोधात कृषी विभाग आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत मोठा साठा जप्त केला. प्रतिबंधित एचटीबीटी - प्लॅटिनम 5G- बियाण्यांची ४०० पाकिटे, दोन चारचाकी वाहने आणि मोबाईल असा सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

-----------------------------------------------

हवामान

अकोल्यात आज ४३ पूर्णांक ८ दशांश अंश इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. प्रादेशिक हवामान खात्याने दिनांक 15, 16 आणि 17 एप्रिल साठी विदर्भातील अनेक जिल्हयांमध्ये उष्णतेचा येलो अलर्ट जारी केला आहे. मागील काही दिवसांपासून विदर्भातील सर्व जिल्हयांच्या उष्णकांत सातत्यानं वाढ होत आहे. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे वगळता इतर सर्व जिल्हयात उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज नागपुरात 40 पूर्णांक दोन दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

-----------------------------------------------